प्रकरण-पहिले

# प्रस्तावना

LIBRARY
KOLHAPUR

## प्रकरण पहिले

## प्रास्ताविक


| | | |
|---|---|---|
| १.१ | - | विषय प्रवेश |
| १.२ | - | समस्येचे शाब्दांकन |
| १.३ | - | संशोधनाचे महत्त्व व व्याप्ती |
| १.४ | - | संशोधनाची उद्दिष्टे |
| १.५ | - | गृहितके |
| १.६ | - | संशोधनाच्या मर्यादा |
| १.७ | - | संशोधन पद्धती |
| १.८ | - | प्रकरणीकरण |

## प्रकरण पहिले

## प्रा स्ता वि क

### १.१ विषयप्रवेश :

मराठी ही बहुसंख्य महाराष्ट्रीयांची मातृभाषा. महाराष्ट्र राज्याची ती राज्यभाषाही आहे. महाराष्ट्रात तरी दैनंदिन व्यवहारात मराठीचा सर्वदूर वापर होतो. शिक्षणाचे माध्यम म्हणूनही तिचा वापर होतो. एक स्वतंत्र अभ्यास विषय म्हणूनही मराठीचा अभ्यास केला जातो. हा अभ्यास होताना श्रवण, भाषण, वाचन, लेखन या चारही विभागातील किमान कौशल्ये विद्यार्थ्यांनी आत्मसात करावीत अशी अपेक्षा असते. शिक्षणाच्या प्राथमिक स्तरापासून ते विद्यापीठीय स्तरांपर्यंत विविध स्तरांवर भाषाभ्यासाची उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत. आणि त्यांना अनुसरून अध्यापन अध्ययन होत असते. भाषाभ्यासात भाषेच्या संरचनेचा अभ्यास अभिप्रेत असतो. विद्यार्थ्यांनी भाषेवर प्रभुत्व मिळवून ती शुध्द स्वरूपात वापरली पाहिजे. तथापि, अगदी पदव्युत्तर स्तरांपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या भाषाव्यवहारात व्याकरण शुध्दतेचा अभाव जाणवतो आणि त्यासंबंधी सार्वत्रिक तक्रारही आढळते. महाविद्यालयीन स्तरावर अध्यापनाचे काम करीत असतांना या तक्रारीत तथ्यांश असल्याचे आढळते. विद्यार्थ्यांच्या भाषा-वापरात येणाऱ्या दोषासाठी महाविद्यालयीन अध्यापक माध्यमिक स्तराकडे, माध्यमिक स्तरांवरील अध्यापक प्राथमिक स्तराकडे अंगुलीनिर्देश करून आपल्या-वरची जबाबदारी इतरांवर सोपविण्याचा प्रयत्न करताना आढळतात. विद्या-र्थ्यांनाही भाषा व्यवहारातील आपले दोष लक्षात येत नाहीत. किंबहुना चूक व बरोबर यातील भेदही त्यांच्या लक्षात येत नाही. असे का व्हावे या प्रश्नाचा विचार करताना - भाषा आत्मसात करण्याची प्रक्रिया, भाषेचे अध्यापन, शिक्षणाचे माध्यम म्हणून होणारा भाषेचा उपयोग दैनंदिन

व्यवहाराचे साधन म्हणून होणारा भाषेचा वापर, विद्यार्थ्यांची भाषाभ्यासाकडे पाहण्याची दृष्टी, अध्यापकांची या विषयाकडे पाहण्याची दृष्टी इत्यादी अनेक कारणे संभवू शकतात.

माध्यमिक स्तरावर भाषेच्या शुध्द वापरावरचे विद्यार्थ्यांचे प्रभुत्व वाढावे ह्या अपेक्षेतून माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मराठी लेखनातील दोषांचा शोध घेऊन त्यांची चिकित्सा करणे व त्यावर उपाययोजनांचा शोध घेणे आवश्यक ठरते. शोध-निबंधाचा विषय असा निश्चित केला आहे. "इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांच्या मराठी लेखनातील दोषांचा चिकित्सक अभ्यास."

१.२ <u>समस्येचे शाब्दांकन</u> :

वरील विवेचनानुसार प्रस्तुत संशोधनसमस्येचे शाब्दांकन खालील प्रमाणे केले आहे.

"इयत्ता नववीच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या मराठी लेखनातील दोषांचा चिकित्सक अभ्यास"

संशोधन हे एक शास्त्रीय अभ्यासकार्य आहे. कोणत्याही विषयाचा शास्त्रशुध्द अभ्यास करताना संज्ञा एका विशिष्ट अर्थानेच वापराव्या लागतात. यासाठी, तसेच संशोधन विषय अधिक स्पष्ट व्हावा या हेतूने संशोधन समस्येच्या वरील विधानात वापरलेल्या महत्त्वाच्या शब्दांच्या व्याख्या खालील प्रमाणे केल्या आहेत.

<u>"इयत्ता नववीचा वर्ग"</u>

या संज्ञेमध्ये माध्यमिक स्तरावरील इयत्ता नववीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश होतो. सबब हे संशोधन इयत्ता नववीत

शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मराठी लेखनातील दोषांच्या संदर्भात आहे.

"मराठी"

प्रस्तुत शोधनिबंधात इयत्ता नववीच्या वर्गातील विद्यार्थी प्रथम-भाषा म्हणून मराठीचा अभ्यास करतात, त्याअर्थाने "मराठी" ही संज्ञा वापरली आहे.

"लेखन"

मराठी या भाषाविषयाच्या अनुषंगाने इयत्ता नववीतील विद्यार्थी जे लेखन करतात ते लिखाण या अर्थाने "लेखन" ही संज्ञा वापरली आहे.

"दोष"

इयत्ता नववीच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या लेखनात शब्दांतील -हस्व-दीर्घ अक्षरे, अनुस्वार, जोडाक्षरातील व 'र'ची अचूक रचना याबाबतीत होणाऱ्या चुका या अर्थाने "दोष" ही संज्ञा वापरली आहे. शुध्द-लेखनातील दोष ( orthographical Mistake ) या अर्थाने ही संज्ञा वापरली आहे.

चिकित्सक अभ्यास :

या संदर्भात चिकित्सक अभ्यास म्हणजे सूक्ष्म, सांगोपांग, सविस्तर, तपशीलवार, समीक्षात्मक अभ्यास होय. चिकित्सक अभ्यासात कारण-मीमांसा आणि उपाययोजना यांचाही अंतर्भाव अभिप्रेत आहे. प्रस्तुत शोधनिबंधाच्या संदर्भात इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांच्या लेखनदोषांची कारणमीमांसा करून ते दोष दूर होण्यासाठी उपाययोजना सुचविल्या आहेत.

१.३ संशोधनाचे महत्त्व व व्याप्ती :

श्रवण, भाषण, वाचन, लेखन अशा चार प्रकारात भाषा वापरली जाते. भाषेच्या अभ्यासाची सर्व उद्दिष्टे ही "चार भाषिक कौशल्ये आत्मसात करण्यावर केंद्रित झालेली आहेत." लेखन विषयक उद्दिष्टात, भावना, कल्पना, विचार यांच्या सामर्थ्याच्या विकासाबरोबरच शुध्द लेखनाचा अंतर्भाव होतो. निर्दोष लेखनाला महत्व आहे. तथापि "दुर्दैवाने आज शुध्दलेखनाच्या बाबतीत सर्वच मराठी भाषिकांमध्ये विलक्षण अनास्था आढळून येते. इंग्रजी शब्दांच्या स्पेलिंगच्या बाबतीत आम्ही जितके जागरूक तितकेच मराठी शुध्दलेखनाच्या बाबतीत उदासीन ... चांगले सुशिक्षित व सुसंस्कृत म्हणवणाऱ्या लोकांच्याही मराठी लिहिताना होणाऱ्या चुका पाहून मन आश्चर्यचकित होते.[२]

आपल्या भावना, कल्पना, विचार प्रकट करण्यासाठी जी दोन मुख्य साधने वापरली जातात ती म्हणजे भाषण व लेखन हे स्पष्ट करून लेखन क्षमतांचा निर्देश करताना लीला पाटील "लिपीतील सर्व अक्षरे व जोडाक्षरे बिनचूक लिहिता येणे"[3] ही लेखनाची प्राथमिक कसोटी असल्याचे सांगतात.

मराठी भाषिकांच्या शुध्दलेखनाविषयीच्या अनास्थेची तक्रार सार्वजनिक झालेली आहे. पूर्व प्राथमिक शिक्षणापासून पदव्युत्तर स्तरांपर्यंतचे शिक्षण मराठी माध्यमातून घेऊन किंबहुना पदव्युत्तर स्तरावर भाषा म्हणून मराठीचा विशेष अभ्यास केल्यानंतरही निर्दोष लेखन करता येत नाही. ही वस्तुस्थिती मराठी अस्मितेला स्पृहणीय नाही.

शुध्दलेखनाच्या नियमानुसार निर्दोष लेखन करणे ही सवय आहे. आणि शालेयस्तरावर ती जाणीवपूर्वक लावली पाहिजे. ती प्रयत्नपूर्वक संवर्धित केली पाहिजे. नियोजन पूर्वक प्रयत्नशील राहिल्यास विद्यार्थ्यांना

निर्दोष लेखनाची सवय लावता येईल. यादृष्टीने प्रस्तुत अभ्यासात इयत्ता नववीच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या मराठी लेखनातील दोषांचा चिकित्सक अभ्यास होणार आहे. इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत विद्यार्थ्यांनी भाषा विषय म्हणून मराठीचा स्वतंत्रपणे अभ्यास केलेला असतो. त्याप्रमाणेच अन्य विषयांचा अभ्यासही मराठी माध्यमातून केलेला असतो. प्राथमिक स्तरांपर्यंत मराठीचे अध्यापनही विशिष्ट उद्दिष्टांनुसारी झालेले असते. विद्यार्थ्यांनी निर्दोष लेखन करावे अशी अपेक्षा असते. या अपेक्षेची परिपूर्ती कितपत झालेली आहे याचा शोध इयत्ता नववीच्या लेखन दोषांच्या चिकित्सक अभ्यासातून करणे इष्ट ठरते. शिवाय इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांचा या दृष्टीने केलेला अभ्यास इयत्ता दहावीच्या दृष्टीने मार्गदर्शक व उपयुक्त ठरणार आहे. माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचे लेखन निर्दोष झाल्यास महाविद्यालयीन स्तरावर आणि विद्यार्थ्यांच्या भावी जीवनात ते उपयुक्त ठरेल.

विद्यार्थ्यांचे मराठी लेखन निर्दोष व्हावे या दृष्टीने काही पूर्वाभ्यास झालेली आहे. उदाहरणार्थ मराठीचे "अध्ययन अध्यापन" ह्या ग्रंथात श्री. ना.वि. पाटणकर / सौ.लीला पाटील यांनी विद्यार्थ्यांना निर्दोष लेखनाची सवय लागावी म्हणून काही मार्गदर्शन केलेले आढळते.[४] "मराठी भाषेतील शुध्दलेखनविषयक पहिले पुस्तक इ.स. १८६२ मध्ये श्री. रामचंद्र विनायक ओक यांनी लिहिले. त्यांचे नांव "मराठी शुध्द लिहिण्याविषयी अनुगम" असे होते. (अनुगम = एखाद्या विषयाचे संपूर्ण आकलन) त्यानंतर गो.ब. बापट (१८६९), ना.रा. महाडेश्वर (१८७०), रा. आ. चितळे (१८७४) वगैरेंची पुस्तके प्रसिध्द झाली."[५] त्यानंतरच्या काळात मराठी साहित्य परिषदेने १९३० साली शुध्दलेखनाचे नियमसिध्द केले. मुंबई विद्यापीठाने १९४६ साली शुध्दलेखनविषयक नियम केले. विदर्भ साहित्य-

संघानेही स्वतंत्रपणे लेखन नियम केले. मराठी लेखनात सुसूत्रता यावी म्हणून मराठी साहित्य महामंडळाने १९७२ साली "लेखनविषयक नियम" प्रसिध्द केले आहेत. या नियमांच्या आधारे विद्यार्थ्यांचे मराठी लेखन निर्दोष व्हावे या दृष्टीने केलेले प्रयत्न व अभ्यास लक्षणीय आहेत. तथापि, तो स्फुट व त्रुटीत स्वरुपात आहे. सदरचा अभ्यास काही लेखनदोषांचे दिग्दर्शन करण्यापुरता मर्यादित राहिलेला आहे. या अभ्यासात चिकित्सक व संशोधनात्मक दृष्टीचा अभाव जाणवतो. पूर्वसूरींनी केलेला हा अभ्यास ह्या विषयाच्या चिकित्सक अभ्यासात पर्यदर्शक ठरणारा असला तरी तो अत्यंत मर्यादित व अपुरा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मराठी लेखनातील दोषांच्या निर्मूलनासाठी हा चिकित्सक अभ्यास उपयुक्त ठरणार असल्याने महत्वाचा आहे. ह्या अभ्यासातून इयत्ता नववीच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या मराठी लेखनातील दोषांचा शोध घेऊन ह्या दोषांच्या कारणांची मीमांसा करुन त्यांच्या लेखनातील दोषांचे निराकरण करुन त्याचे लेखन निर्दोष बनविण्यासाठी काही उपाय शोधले जातील. तद्वत भाषा अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत लेखन दोषांच्या निर्मूलनासाठी काही मार्गदर्शक सूत्रांचा शोध घेता येईल. परिणामी हा अभ्यास विद्यार्थ्यांना निर्दोष लेखन करण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल.

## १.४ संशोधनाची उद्दिष्टे :

या संशोधनाची पुढील उद्दिष्टे आहेत.

१) मराठी विषयाचा प्रथमभाषा म्हणून अभ्यास करणाऱ्या मराठी माध्यमाच्या इयत्ता नववीच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या मराठी लेखनात कोणकोणते दोष होतात ते पाहणे.

२) मराठी विषयाचा प्रथमभाषा म्हणून अभ्यास करणाऱ्या मराठी माध्यमाच्या इयत्ता नववीच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या मराठी लेखनातील दोषांच्या कारणांचा शोध घेऊन त्यांची मीमांसा करणे.

३) इयत्ता नववीच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या लेखनातील दोषांचे निराकरण करण्यासाठी अध्ययन-अध्यापनास उपयुक्त ठरातील अशा मार्गदर्शक सूत्रांचा शोध घेणे.

४) निर्दोष मराठी लेखनाचे महत्व विद्यार्थ्यांना समजावून देणे आणि निर्दोष लेखनासंबंधीची जाणीव विद्यार्थ्यांत निर्माण करणे.

१.५ गृहितके :

प्रस्तुत संशोधन करताना पुढील गोष्टी गृहित धरल्या आहेत.

१) विद्यार्थ्यांना निर्दोष मराठी लेखन करता येते.

२) विद्यार्थ्यांच्या मराठी लेखनातील होणाऱ्या दोषांचे निराकरण करता येते.

१.६ संशोधनाच्या मर्यादा :

१) हे संशोधन गारगोटी, तालुका भुदरगड, जिल्हा कोल्हापूर येथील विविध माध्यमिक शाळांतील इयत्ता नववीच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या मराठी लेखनातील दोषांच्या अभ्यासापुरते मर्यादित आहे. शब्दलेखनातील दोषांच्या अभ्यासापुरते हे संशोधन मर्यादित आहे.

२) हा अभ्यास करण्यासाठी निवडलेले विद्यार्थी हे "गारगोटी" या गावातील असणार आहेत. गारगोटी हे गाव तालुक्याचे आहे. या अभ्यासात गारगोटीच्या परिसरातील इयत्ता नववीच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या लेखनदोषांचा अभ्यास केला असल्याने क्षेत्रिय दृष्टीने या अभ्यासात मर्यादा आहे. त्यामुळे शहरी विभागातील विद्यार्थ्यांच्या मराठी लेखनातील दोषांचा अभ्यास येथे अभिप्रेत नाही. गारगोटी येथे तीन माध्यमिक शाळा आहेत. त्यापुढील

प्रमाणे -

१) श्री शाहू कुमार भवन, २) न्यू इंग्लिश स्कूल, ३) जेबिलिना गर्ल्स हायस्कूल.

३) भाषा श्रवण, भाषण, वाचन, लेखन या चार प्रकारे वापरली जाते. तथापि या शोधनिबंधात लेखन दोषांचाच अभ्यास केला आहे.

४) लेखनदोष म्हणजे मराठी साहित्य महामंडळाने केलेल्या व महाराष्ट्र शासनाचे स्वीकृत केलेल्या लेखन नियमांना अनुसरून नसलेले लेखन होय. व्याक्यरचनेच्या दोषांचा समावेश येथे अभिप्रेत नाही.

## १.७ संशोधनपध्दती :

हे संशोधन वर्तमान परिस्थितीशी संबंधित असल्याने सर्वेक्षणात्मक पध्दती वापरली आहे. या समस्येच्या संदर्भात सद्य:स्थिती कोणती आहे हे जाणून घेण्यासाठी सर्वेक्षणात्मक पध्दती वापरली आहे. या पध्दतीच्या आधारे मिळालेल्या सामग्रीचे संकलन, वर्णन, वर्गीकरण, स्पष्टीकरण, मूल्यांकन केले आहे व अपेक्षित बदलांसाठी उपाययोजना सुचविल्या आहेत.

या संशोधनासाठी लागणारी सामग्री मिळविण्यासाठी पुढील साधनांचा वापर केलेला आहे.

१) गारगोटी येथील माध्यमिक शाळांतील इयत्ता नववीच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या मराठी विषयाच्या झालेल्या चाचणी परीक्षेच्या उत्तरपत्रिकांची तपासणी करून लेखनदोषांची नोंद केली आहे.

२) विद्यार्थ्यांच्या मराठी विषयाच्या गृहपाठाच्या वहयातील एका गृहपाठाची तपासणी करून त्यातील लेखनदोषांची नोंद घेतली.

३) विद्यार्थ्यांना एका विशिष्ट परिच्छेदाचे श्रुतलेखन दिले व त्यात होणा-या लेखनदोषांची नोंद घेतली.

४) विद्यार्थ्यांच्या लेखन दोषांसंबंधीची कारणे, शिक्षकांची भूमिका व जबाबदारी यासंदर्भात विशिष्ट प्रश्नावलीच्या आधारे मराठी विषयाचे अध्यापन करणा-या शिक्षकांच्या मुलाखती घेऊन माहिती संकलित केली.

वरील विविध साधनांद्वारे जी माहिती गोळा झाली तिची वेगवेगळी नोंद घेऊन, तिचे वर्गीकरण करून, विश्लेषण करून, योग्य मांडणी करून वस्तुस्थितीची स्पष्ट कल्पना मांडली आहे.

या वस्तुस्थितीचा अभ्यास करून अपेक्षित स्थितीच्या संदर्भात या वस्तुस्थितीचे स्वरूप लक्षात घेतले. या समस्येच्या संबंधित बाबींचे निरीक्षण करून समस्येचे निश्चित स्वरूप मांडण्यात येऊन प्राप्त माहितीच्या आधारे योग्य ते निष्कर्ष काढले आहेत. या सर्व निष्कर्षांचा एकत्र व सूत्रबध्द विचार करून प्रस्तुत समस्येच्या संदर्भात कोणती उपाययोजना करणे आवश्यक व शक्य आहे हे स्पष्ट केले आहे.

## १.८ प्रकरणीकरण :

वरील प्रकारे संकलित केलेल्या सामग्रीचे वर्गीकरण व पृथ:करण करून तसेच आवश्यक ती परिमाणे वापरून त्यावर आधारित निष्कर्ष काढले आहेत. त्याचप्रमाणे शिफारशी केल्या आहेत. या सर्वांचे निम्न निर्देशित प्रकरणात विभाजन केले आहे.

### १. प्रास्ताविक -

या प्रकरणात ही समस्या कशी निर्माण झाली याचा ऊहापोह करून

समस्येचे शाब्दांकन केलेले आहे. संशोधनाचे स्वरूप, महत्व, व्याप्ती, मर्यादा स्पष्ट केलेल्या आहेत. या समस्येच्या अभ्यासासाठी कोणती संशोधन पध्दती उपयोजिली आहे हे स्पष्ट केले आहे.

२. <u>संशोधनाशी संबंधित साहित्याचा आढावा -</u>

संशोधन विषयांच्या संदर्भात पूर्वसूरींनी केलेल्या अभ्यासाचा आढावा या प्रकरणात घेऊन त्याची उपयुक्तता व मर्यादा स्पष्ट केलेल्या आहेत.

३. <u>लेखन दोषांचे स्वरूप :</u>

संशोधनासाठी संकलित केलेल्या सामग्रीच्या आधारे आढळणाऱ्या लेखन दोषांच्या स्वरूपाची मांडणी या प्रकरणात केलेली आहे. अपेक्षित निर्दोष लेखनाच्या संदर्भात या लेखनदोषांची चिकित्सा केलेली आहे.

४. <u>लेखनदोषांच्या कारणांची मीमांसा व उपाय योजना :</u>

या प्रकरणात लेखनात आढळणाऱ्या दोषांची कारणमीमांसा करून हे दोष दूर करण्यासाठी कोणते उपाय योजता येतील यासंबंधीचा विचार करून हे उपाय निश्चित केले आहेत.

५. <u>निष्कर्ष व शिफारसी :</u>

या प्रकरणामध्ये संशोधनाचे निष्कर्ष मांडून या निष्कर्षांच्या आधारे शिफारशी केलेल्या आहेत. तसेच संशोधन विषयाच्या अनुषंगाने पुढील संशोधनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या समस्यांचा निर्देश केलेला आहे.

.......

## प्रकरण पहिले

### संदर्भ


(१) पाटील लीला, मराठीचे अध्यापन व मूल्यमापन, प्र.आ. (पुणे, व्हीनस प्रकाशन, १९७८), पृ.१४.

(२) दुंडले म.बा., मराठीचे अध्यापन, प्र.आ. (पुणे, श्री विद्याप्रकाशन, १९७४), पृ. १८९.

(३) पाटील लीला, मराठीचे अध्यापन व मूल्यमापन, प्र.आ. (पुणे, व्हीनस प्रकाशन, १९७८), पृ. २२

(४) पाटणकर ना.वि./पाटील लीला, मराठीचे अध्ययन अध्यापन, प्र.आ. (पुणे, व्हीनस प्रकाशन, १९७०) पृ. ५४.

(५) वाळंबे मो.रा., मराठी शुध्दलेखन प्रदीप, आवृत्ती २ री, (नितीन प्रकाशन, पुणे, १९८१),पृ.३.


......